डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना या योजनेकरिता जून, २०१९ च्या पावसाळी अधिवेशनात नवीन बाब प्रस्तावाद्वारे मंजुर निधी वितरीत करणेबाबत...

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग,

शासन निर्णय क्रमांक : पूरक-२०१९/(५४/१९)/मशि-३

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,

मंत्रालय विस्तार इमारत, मुंबई -४०० ०३२.

दिनांक : २० ऑगस्ट, २०१९.

संदर्भ : १) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. अर्थसं-२०१८/(१८०/१८)/मशि-३, दिनांक २८ फेब्रुवारी, २०१९.

२) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. अर्थसं-२०१९/ प्र.क्र.९२/अर्थ-३, दिनांक ०८ जुलै, २०१९.

प्रस्तावना :-

संदर्भीय शासन निर्णयान्वये उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांसाठी लागु करण्यात आलेल्या “डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना” या योजनेकरिता नवीन लेखाशिर्ष उघडण्यास मंजुरी देण्यात आली आहे. त्यास अनुसरुन जून, २०१९ च्या पावसाळी अधिवेशनात “२२०२ आय ६६६” या लेखाशिर्षांतर्गत “३४ शिष्यवृत्ती / विद्यावेतने” या उद्दिष्टाखाली रु.३.०० कोटी इतक्या निधीच्या नवीन बाब प्रस्तावास मान्यता प्राप्त झाली आहे. नियोजन व वित्त विभागाच्या मान्यतेनुसार नवीन बाब प्रस्तावाद्वारे मंजुर झालेल्या निधीच्या ६० टक्के इतकी रक्कम वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे “डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना” या योजनेकरिता सन २०१९-२० या वित्तीय वर्षासाठी "मागणी क्र. डब्ल्यु-२, २२०२ सर्वसाधारण शिक्षण, ८० सर्वसाधारण, १०७ शिष्यवृत्त्या, ०१ - साधारण शिष्यवृत्त्या, (०१)(१२) डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना (२२०२ आय ६६६) ३४ - शिष्यवृत्त्या / विद्यावेतने " या तपशिलवार लेखाशिर्षांतर्गत नवीन बाब प्रस्तावाद्वारे मंजुर झालेल्या रु.३,००,००,०००/- इतक्या रकमेच्या ६० टक्के इतक्या मर्यादेत रु.१,८०,००,०००/- इतका निधी वितरीत करण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

हा शासन निर्णय नियोजन विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र.१४७ /१४७१, दि.१७.०७.२०१९ व वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र.४९५/२०१९/व्यय-५, दि.३०.०७.२०१९ अन्वये प्राप्त सहमतीने तसेच वित्त विभागाच्या दि.०८.०७.२०१९ रोजीच्या परिपत्रकास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असुन त्याचा संकेतांक क्र. २०१९०८२०१२२५१६९८०८ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Hemantkumar Pandharinath Baviskar

Digitally signed by Hemantkumar Pandharinath Baviskar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=71de9bdf8c28541d92a5cd36d722315bab7f006ec5420633722d42e0976d82a8, serialNumber=284a4236ae7795d36dd2ecb5ac6ca70c333a3cf1b13f66828d224ae2026b37e9, cn=Hemantkumar Pandharinath Baviskar
Date: 2019.08.20 12:42:30 +05'30'

(हे. पं. बाविस्कर)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर.
३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर.
४. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
५. वित्त विभाग (व्यय-५), मंत्रालय, मुंबई-३२.
६. नियोजन विभाग (का-१४७१), मंत्रालय, मुंबई-३२.
७. कक्ष अधिकारी, साशि-१, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
८. निवड नस्ती मशि-३, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.